Thursday the 27th November, 2014

RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक २३] गुरुवार, जुलै ३१, २०१४/श्रावण ९, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ५८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६.**—महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | पृष्ठे १-३ |

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै २०१४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVI OF 2014.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.

**सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६.**

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९९४ चा महा. ३५. आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ याच्या अनुसूचीच्या भाग एक मधील नोंद २ मध्ये स्तंभ (२) मधील "पुणे विद्यापीठ" या मजकुराऐवजी "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ" हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९९४ चा महा. ३५.

## निवेदन

पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने, श्रीमती सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण व महिला शिक्षण क्षेत्रातील बहुमोल व मौल्यवान कार्य, तसेच त्यांनी घेतलेले अथक परिश्रम आणि त्यांचा नावलौकिक विचारात घेऊन आणि भावी पिढीला त्यांचा आदर्श आणि विचारांचे अनुकरण करता यावे म्हणून आपल्या ठरावाद्वारे पुणे विद्यापीठाच्या नावाचा विस्तार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा करण्याची शिफारस राज्य शासनाला केली आहे. शासनास यासंबंधात लोकप्रतिनिधींकडूनही अनेक निवेदने प्राप्त झाली आहेत. उक्त ठराव आणि याबाबतीत आलेली निवेदने विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनास, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५), यात यथोचितरित्या सुधारणा करून त्याद्वारे पुणे विद्यापीठाच्या नावाचा विस्तार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, असे करणे इष्ट वाटते.

राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, आणि म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक २५ जुलै २०१४.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक ३२] गुरुवार, जुलै ३१, २०१४/श्रावण ९, शके १९३६ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ९२

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2014 (Mah. Ord. XVI of 2014), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANGITRAO PATIL,
I/c. Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2014 (Mah. Ord. XVI of 2014), published under the authority of the Governor).

---

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 31st July 2014.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVI OF 2014.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Universities Act, 1994.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

Mah. XXXV of 1994. AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Universities Act, 1994, for the purposes hereinafter appearing;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is

hereby pleased to promulgate the following Ordinance, namely:-

Short title and commencement.

1. (1) This Ordinance may be called the Maharashtra Universities (Amendment) Ordinance, 2014.

(2) It shall come into force at once.

Amendment of Schedule to Mah. XXXV of 1994.

2. In the Schedule to the Maharashtra Universities Act, 1994, in Part I, in entry 2, in column (2), for the words " The University of Pune ", the words " The Savitribai Phule Pune University " shall be substituted. Mah XXXV of 1994.

STATEMENT

The Management Council of the Pune University has, considering the precious and valuable work and as well as great effort and reputation of Smt. Savitribai Phule in the field of Education and Women Education and in order to keep hard exemplary and ideas before the future generation, by its resolution, recommended to the State Government to extend the name of the University of Pune as Savitribai Phule Pune University. The Government has also received various representations from the people's representatives in this regard. After considering the said resolution and representations received in this behalf, the State Government considers it expedient to extend.the name the of Pune University as Savitribai Phule Pune University, by amending the Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994) suitably.

As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 25th July 2014.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY KUMAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.